‘दृष्टिकोन’ लेखमाला : लेख पाचवा


# सुंदराचे सोहळे

देखणे ते हात ज्यांना, निर्मितीचे डोहाळे । मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे

बा भ बोरकर

---

केतकी घाटे



नोव्हेंबर २०२०

दिवाळीच्या पहिल्या दिवशी काय स्पेशल करायचं म्हणून आदित्य आणि जुईने टेकडीवर जाऊन सूर्योदय पाहायचा ठरवलं. त्यांची टेकडीवर जाण्याची वेळ नेहेमीची संध्याकाळची असायची. चढता चढता जुई म्हणाली, “दिवाळीची हवा कशी टिपिकल असते ना. किंचितसा झोंबणारा गारवा भारीच वाटतो. सणाच्या उत्साहात भर घालतो.”

“हो गं अगदीच. हवामान बदलामुळे अनेक बदल होतायेत तसे. पण ठीके. दिवाळीची ‘हवा’ असते हे अगदीच मान्य. पण बाकी पूर्वी ज्या गोष्टी केवळ दिवाळी स्पेशल होत्या त्या आता आपण वर्षभर करत असतो. चिवडे, लाडू, चकल्या आपण वर्षभर खातो. दिवाळीकाठी कपडे घेण्याची प्रथा दर सणावारी आली आहे असं म्हटलं तर फार अतिशयोक्ती होणार नाही. फटाके लावावेत की नाही हा मुद्दा वेगळा, त्यावर तर चौथीतली पोरं देखील वाद घालताना दिसतात, पण फटाके देखील आता वर्षभर या ना त्या कारणाने वाजवले जातात.”

“तुझा मुद्दा काय आहे ?”

“ही दिवाळीची ‘हवा’ सोडली तर सर्व गोष्टी आपण वर्षभर करत असतो. दिवाळी साजरी करण्यातला पूर्वी असलेला सिग्निफिकन्स बदलला आहे असं वाटतं. पारंपरिक साजरीकरणाला अजून कसली तरी जोड द्यायला हवी असं वाटतं.”

“हं, प्रत्येक गोष्टीची फार चिकित्सा करू नये असं तूच म्हणतोस ना. काही गोष्टी आहेत म्हणून आयुष्यात मजा असते. त्यातला आनंद घ्यावा.”, जुई म्हणाली.

“तुझ्याच संगतीमुळे हे जुई ! गुण नाही पण वाण लागला. आणि चिकित्सा करू नये हे चक्क तू म्हणते आहेस”.

“हो रे.. दिवाळी म्हटलं की मला गावची दिवाळी आठवून नॉस्टॅल्जीक व्हायला होतं. पहाटे थंडीत कुडकुडत उठणं, बंबाला लाकडं घालणं, तेल लावून उटणं लावून त्या थोडयाश्या पण कढत पाण्याने अंघोळ करण्यात काय मजा होती रे. आम्ही उठेपर्यंत आईने घरात सर्वत्र तेलाच्या पणत्या लावलेल्या असायच्या. घरातले दिवे मिणमिणतेच होते पण त्या पिटुकल्या पणत्यांनी घर उजळून निघतंय असं वाटायचं. घरभर उटण्याचा, अत्तराचा सुवास असायचा, बरोबर फराळाचाही. आता

तू म्हणतोस तशी सगळ्यातलीच सुबत्ता एवढी वाढली आहे की कशाचंच फारसं नावीन्य राहिलं नाही. पण तरी परंपरा म्हणून फॉलो करतो आपण. त्यात एक कौटुंबिक जिव्हाळा असतो. आनंद असतो."

"खरं आहे जुई. पण काही लोक वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी करताना दिसतात हं. आमचे जिऑलॉजिस्ट सर गेली कित्तेक वर्षं दिवाळीचे चार दिवस कुठेतरी बाहेर जंगलात जाऊन राहतात. कुटुंबासहित. ते दिवाळी मानतात पण वेगळ्या पद्धतीने साजरी करतात. तिथल्या स्थानिक लोकांबरोबर दिवस घालवतात."

"हं, आपापल्या परीने सेलिब्रेट करणारे पण असतातच. पण अगदीच थोडे. बहुतेक लोक विशेषतः बायका तर सणांचा उगाच लोड घेतात. आमची एक काकी आहे. पी एच डी झाली आहे जस्ट. एरवी शास्त्राचा एवढा उदोउदो करत असते पण सण साजरे करायची वेळ आली की एकदम अंधश्रद्धाळू होते रे. म्हणजे स्वतःच्याच पी एच डी चा विचार रोजच्या आयुष्यात लागू करायची तिची इच्छा नाही की ताकद नाही कळतच नाही. ह्या वर्षी तर बिचारीला काहीही सणासुदीचं करायला वेळ पण नव्हता

रे. आईने सांगितलं तिला की ते गणपती, नवरात्र वगैरे नको करू फक्त ह्यावर्षी. पण असं कसं चालेल म्हणली, रीत ती रीतच ! मुलांवर संस्कार कसे होणार म्हणाली. आणि असं म्हणून त्रागा करत कसंबसं नवरात्र केलं. समजून उमजून डोळसपणे सण करणाऱ्या बायका पण पाहिल्या आहेत मी पण फारच कमी. मनापासून, आनंदाने, कुठलाही ताण न घेता सण साजरे करणार असू तर जरूर करावे. पण एक परंपरा म्हणून अंधपणाने करण्यामागचं प्रयोजन मला उमगत नाही.”

“आता कोण चिकित्सा करतंय ?!,” आदित्य हसत म्हणाला, “पण मला कळतंय तू काय म्हणते आहेस ते आणि माझं तेच म्हणणं आहे. कुठलाही सण आपण वेगळ्या पद्धतीने सेलिब्रेट करूच शकतो ना. गरजूंना मदत करून वगैरे. किंवा हे टोकाचं वाटत असेल तर मित्र नातेवाईकांना जेवायला बोलवावं. वेळ आनंदात घालवावा.”

“हो ना. खरं म्हणूनच प्रथा आहेच सणावारी लोकांना जेवायला बोलावण्याची. माझ्या आईने ह्यावर्षी नवरात्रात नऊ दिवस नऊ गरजू बायकांना जेवायला बोलावून धान्य आणि पौष्टीक पदार्थ देऊन ओटी भरली.

शिवाय तिने घटस्थापना करून पूजा केलीच पण गावाकडे राहूनच माझी आई डोळसपणे सण साजरे करते आहे हे बघून बरं वाटतं. पण एकंदर हे प्रमाण फारच कमी.”

थोडं चालून गेल्यावर जुई म्हणाली, “आद्या, आपण कसं करूयात सेलिब्रेट आपलं नवीन आयुष्य? काहीतरी लक्षात राहील असं करूयात.”

“आपण एकत्र राहणार हेच उत्तम सेलिब्रेशन आहे जुई. अजून काय ते साजरं करणार.”

हे ऐकून जुई सुखावली. पण विचार करून म्हणाली, “अरे असं नाही.. मजा असते. आपल्या घरच्यांना पण मजा येईल. सेलिब्रेट करण्यात. एक समारंभ करू छोटासा. तूच म्हणालास ना मगाशी आपल्याच आयुष्यातली कारणं शोधून सेलेब्रेट करावं म्हणून.”

“माझा विश्वास नाही बसते हे तू म्हणते आहेस असं. आणि नको बाई ! तुझा तो कार्बन फूटप्रिंट आणणार तू प्रत्येक गोष्टीत. फुलांची सजावट म्हटलं तरी तू फुलं कुठून आणली, देशी आहेत का वगैरे प्रश्न विचारून भंडावून सोडशील घरच्यांना. सिल्कच्या साड्या तुला गिफ्ट दिल्या तर त्या पतंगाची संपूर्ण लाईफ सायकल वगैरे

सांगायला घेशील लोकांना. मेनू ठरवताना पौष्टीक आणि सेंद्रिय आहे का हे विचारल्यावर तो स्वैपाकी निरुत्तर होईल. कसं करणार सेलिब्रेशन.”

जुईला खूप हसू येत होतं. ती म्हणाली, “अरे तीच तर गंमत वाटते आहे मला. हा समारंभ प्लॅन करणे ही प्रक्रियाच भारी exciting वाटते आहे मला. कम ऑन आद्या! विचार कर. लो कार्बन फूटप्रिंट असलेला समारंभ प्लॅन करण्यातच मजा आहे.”

त्यावर आदित्य जुईच्याच टोन मध्ये म्हणाला, “पण लो कार्बन फूटप्रिंट हे खूप रिलेटिव्ह आहे.”


“हा हा.. मेरी बिल्ली मुझे ही म्यांव... Let me be precise ! सध्या समाजात साधारण जसे समारंभ होतात त्यापेक्षा कमी फूटप्रिंट असलेला करू एवढंच म्हणायचंय मला.”

जुईचा उत्साह आणि कन्व्हिक्शन बघता आदित्य पण विचार करायला लागला. ह्या बाईंच्या मनात खरंच समारंभ करायचं असं आहे तर. एव्हाना दोघं टेकडीवर सूर्योदय पॉईंटला पोहचले होते. सूर्याकडे बघता बघता नकळत हात हातात बांधले गेले. काही काळ स्तब्ध

गेल्यावर दोघांनीही दगडावर मांडी ठोकली आणि दोन तास जोरदार चर्चा आणि आखणी केली.

पुढचे महिना दोन महिने कसे गेले ते जुईला कळलंच नाही. सगळ्या जवळच्या लोकांना जेवायला बोलवायचं एवढाच समारंभ. पण तयारी खूप नेटकी आणि चोख केली होती. बहुतेक जणांना निमंत्रणपत्रिका मोबाईल वर किंवा मेल वरच पाठवली. काही ज्येष्ठ लोकांसाठी निमंत्रणपत्रिका जुईने स्वतः हाती लिहून काढल्या. त्याकरता वर्तमानपत्र रिसायकल करून हाती बनवलेले कागद आणले. त्यात बिया होत्या. म्हणजे पत्रिका मातीत घातली तर ती कुजल्यावर त्यातून एखादे झाड येणार होते. ह्या पत्रिका देण्यासाठी दोघेही जोडीने ह्या सर्व ज्येष्ठ लोकांच्या घरी पोहोचले होते थेट सायकलवरून. पहिली पत्रिका गुरुवर्यांना द्यायची ठरली. सर सुखावले होते, "एकीकडे लिव्ह इन रिलेशनशिपसारखी आधुनिक गोष्ट आणि दुसरीकडे अगदी स्वतः जातीने पत्रिका लिहून आमंत्रण ! वा ! तुमच्या नात्यात मला आधुनिक आणि पारंपरिकचा उत्तम मेळ दिसत आहे. तो असाच वृद्धिंगत होवो !" पत्रिकेवरचा पत्ता बघून मॅडम चक्रावल्या, "आंब्याचा विशाल वृक्ष, मुळा नदीचा काठ. मु. पो. चांदे.

वा ! भारीच जागा निवडली आहेत. पण चांदे म्हणजे जवळ आहे. नक्की येऊ आम्ही.”



कार्यक्रमाच्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता एकेक करून लोक जमायला सुरवात झाली. अतिशय विशाल असा आंबा चांद्यात प्रसिद्धच होता. डेरेदार गर्द हिरवी सावली देणारा. आत्ताच्या सिझननुसार सुंदर मोहोरला होता. त्याच्या खालचं अंगण स्वच्छ झाडलेलं आणि सारवलेलं होतं. फुलांच्या आणि पानांच्या अगदी मोजक्या पण सुबक रांगोळया काढल्या होत्या. जुईने स्वत: त्यात मदत केली होती. अंगणात सर्व बाजूंनी सुंदर सजावट होती. बांबूचा मांडव उभारून त्यावरून भेरली माडाच्या फळांच्या माळा एकेक करून एकसारख्या अंतरावर वरपासून जमिनीपर्यंत सोडल्या होत्या. मधे मधे चक्क पळसाच्या फुलांच्या माळा लावल्या होत्या. बऱ्याच ठिकाणी कंदील टांगलेले होते. विविध प्रकारचे गजरे एका मातीच्या परळीत ठेवले होते. त्यात वाळवलेल्या बकुळ आणि सुरंगीच्या फुलांचे गजरे होते आणि नेहेमीचे देखील होते. जुई आणि आदित्य

अत्यंत सुरेख अशा कॉटनच्या पोषाखात अत्यंत हसत मुखाने सर्वांचं स्वागत करत होते. आपल्या आई वडलांची, आजीची सगळयांशी ओळख करून देत होते.

अंगणात टेबलं मांडून त्यावर विविध रंगाच्या सुरेख चादरी अंथरल्या होत्या. प्रत्येक टेबलाभोवती खुर्च्या ठेवल्या होत्या. एका कोपऱ्यात जेवणाच टेबल होतं. त्यावर अगदी घरचीच भांडी आणून ठेवल्यासारखी पितळीची चमकदार भांडी होती. कुठेही वापरा आणि फेका वस्तू शोधूनही दिसत नव्हत्या. एका कोपऱ्यात मोठा माठ आणि स्टीलचे पेले ठेवले होते. प्रत्येक टेबलवर तांब्या भांडं ठेवलं होतं. आंब्याच्या एका कोपऱ्यात एक नळ होता. तिथे बंब वापरून थोडं  जुगाड करून हात धुण्याची सोय केली होती. तिथल्या टेबलवर स्वच्छ खादीच्या हातरुमालांची थप्पी होती. जेवणासाठी स्टीलच्याच ताट वाट्या होत्या. आंब्याच्या मागच्या बाजूला चूल मांडून चांदयातल्याच बायका नाचणीच्या भाकरी थापत होत्या. पोपटी नावाची खास कोकणी डिश तयार होत होती. विदर्भातल्या मित्रांनी खास वाळवलेली मोहाची फुलं आणली होती. त्याचीच भजी, पुरणपोळी असे चविष्ट आणि पौष्टिक पदार्थ असलेला बेत होता.

जावयाची गुंडी नावाचा चांद्यातला खास तांदूळ होता त्याचा मसालेभात तयार होत होता. फॉरेस्ट फूड ठेवायचा मोह जुईने टाळला होता. चुकूनही तसा ट्रेंड होऊ नये असं तिला वाटलं कारण शहरी मागणी वाढली तर फॉरेस्ट फूड संपायला वेळ लागायचा नाही. त्यामुळे मुद्दाम शेतात किंवा निसर्गात भरपूर उगवणारे जिन्नस निवडले होते. पेयपान म्हणून मोहाच्या दारूपासून, जांभळाची वाईन, कोकम, करवंद, अंबाडीची सरबतं, टाकळ्याची कॉफी असे काही प्रकार होते. हे सगळं सर्व्ह करायला जुईची हॉस्टेल गॅंग होती. हसत खिदळत दोन तास कसे गेले कळलं नाही.

एकीकडे जेवणं सुरु असतानाच अंधार पडू लागताच मित्र मंडळींनी कंदील पेटवले. पणत्या लावल्या. आणि आंब्याखालचा माहोल पूर्ण बदलून गेला. आणि तारपाच्या आवाजाने सगळ्यांचं लक्ष वेधलं. जुईचा आदिवासी भागात काम करणारा एक मित्र त्याच्या वारली बांधवांना घेऊन आला होता. ते तारपाच्या तालावर नृत्य करू लागले तशी या मेजवानीला अधिकच रंगत चढली. एकेक करून अनेकजण त्या नृत्यात सामील होत होते. जुई पण त्यात सामील झाली. आजीचं सगळं

लक्ष आपल्या नातीवर होतं. आज जुई विशेष सुंदर दिसत होती. सोनेरी काठ असलेल्या पांढऱ्या साडीबरोबर तिने खास निवडून आणलेले बियांचे दागिने घातले होते. आजी आज हरखून गेली होती. तिनं हे सगळं बघावं अशी जुईची फार इच्छा होती. आपली नात वेगळं काम करत आहे हे तिला ठाऊक होतं पण आज हा सगळा सोहळा बघून, त्या मागचा विचार बघून तिला धन्य वाटत होतं. जाणाऱ्या प्रत्येकाच्या हातात जुईचं एकेक रोप देणाऱ्या आदित्यला बघूनही तिची काळजी संपली होती. आदित्यला जावई म्हणायचं की काय म्हणायचं हा प्रश्न कधीच निकालात निघाला होता. बसल्या बसल्या तारपाच्या तालावर हळू हळू तिच्या पावलांनी कधी ठेका धरला तिलाही कळलं नाही. तिच्या कानात बोरकरांचे शब्द घुमत होते...देखणे ते हात ज्यांना, निर्मितीचे डोहाळे ! मंगलाने गंधलेले, सुंदराचे सोहळे !!

❖ ❖ ❖